जाहीर सूचना

पुणे महानगरपालिका आकाशचिन्ह व परवाना विभाग

जाहीर सूचना (अनधिकृत होर्डिंग्ज बॅनर फ्लेक्स पोस्टर व जाहिराती)

क्र:/ पुमपा/आपवि/ 1921 / २०२६ / दिनांक: 23/11/2026

सर्व नागरिक, राजकीय पक्ष, सामाजिक सांस्कृतिक धार्मिक संस्था/मंडळे जाहिरातदार, जाहिरात संस्था, मुद्रक (प्रिंटर्स) व कार्यक्रम आयोजक यांना याद्वारे कळविण्यात येते की ,

१. पुणे महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्ता, पदपथ, चौक, दुभाजक, विद्युत खांब, झाड, पुल, भिंत अथवा कोणत्याही सार्वजनिक वा खाजगी मालमत्तेवर **महानगरपालिकेच्या पूर्व लेखी** परवानगीशिवाय कोणतेही होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर, झेंडा, कमान, कट-आउट अथवा जाहिरात लावणे हा **महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे कलम ३ अन्वये दंडनीय अपराध आहे (तीन महिन्यांपर्यंत कारावास किंवा रु.२,०००/- पर्यंत दंड, अथवा दोन्ही) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २४५ अन्वये कारवाईस पात्र आहे.**

२. मा मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ३१.०१.२०१७ रोजीच्या निकालाद्वारे (सुस्वराज्य फाउंडेशन व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका) व त्यानंतरच्या आदेशांद्वारे सदर अधिनियमाची कठोर अंमलबजावणी करण्याचे आणि **अनधिकृत होर्डिंग/बॅनर उभारणाऱ्या व्यक्तींसह, ज्यांची नावे, छायाचित्रे वा पदनामे त्यावर प्रदर्शित आहेत अशा व्यक्तीं विरुद्धही फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.**

३. त्यानुसार कोणतेही अनधिकृत होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स वा पोस्टर आढळून आल्यास, कोणतीही स्वतंत्र पूर्वसूचना न देता महानगरपालिकेमार्फत –

- सदर होर्डिंग/बॅनर तात्काळ काढून टाकण्यात येईल व काढण्याचा संपूर्ण खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल;
- महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे कलम ३ सह भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या संबंधित तरतुदींन्वये तसेच सुस्वराज्य जनहित याचिका मध्ये दिलेल्या निर्देशानुसार अधिनियम नुसार ,

(अ) होर्डिंग/बॅनर उभारणारी वा उभारण्यास कारणीभूत ठरणारी व्यक्ती , (ब) ज्यांचे नाव, छायाचित्र वा पदनाम लाभार्थी म्हणून प्रदर्शित आहे. अशी व्यक्ती , (क) संबंधित मुद्रक व जाहिरात संस्था, आणि (ड) जाहिरात केलेल्या कार्यक्रमाचे आयोजक यांच्याविरुद्ध प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करण्यात येईल.

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये जाहिरात शुल्क व दंड वसुलीसह दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

४. ज्या होर्डिंग/बॅनरवर एखाद्या व्यक्तीचे नाव वा छायाचित्र प्रदर्शित आहे, ते होर्डिंग/बॅनर त्या व्यक्तीच्या माहितीने व संमतीने उभारण्यात आले आहे, असे चौकशी व अभियोगाच्या प्रयोजनार्थ गृहीत धरण्यात येईल - मात्र सदर प्रदर्शन निदर्शनास येताच संबंधित व्यक्तीने तात्काळ संबंधित क्षेत्रीय कार्यालयात लेखी अस्वीकृती (disclaimer) व संबंधित पोलीस ठाण्यात "सदर प्रदर्शन माझ्या संमतीशिवाय आहे" अशी तक्रार दाखल केल्यास ही बाब विचारात घेण्यात येईल.

५. प्रत्येक छापील होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स वा पोस्टरवर मुद्रकाचे नाव-पत्ता व ज्याच्या सांगण्यावरून छपाई केली त्या व्यक्तीचे नाव पत्ता नमूद असणे बंधनकारक आहे अनधिकृत प्रदर्शनासाठी छपाई करणाऱ्या मुद्रकांवर सहआरोपी (abettor) म्हणून कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

६. निर्धारित जागांवर होर्डिंग, बॅनर व जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी विहित शुल्क भरून आकाशचिन्ह व परवाना विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडून परवानगी घेता येईल. अर्ज **(https://www.pmc.gov.in) (services.pmc.gov.in)** या संकेतस्थळावर ऑनलाईन अथवा संबंधित क्षेत्रीय कार्यालयात सादर करता येतील.

७. **bhauflexkadha.pmc.gov.in** अथवा PMC-care number वर कळवावे.

वरीलप्रमाणे कारवाई करण्यापूर्वी कोणतीही स्वतंत्र वैयक्तिक नोटीस देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

आदेशावरून व महापालिका आयुक्त यांच्या नावे,

अतिरिक्त महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका